नि.फौ.ख.क्र.३२५/२०१९ .
सरकार वि. प्रभाकर
निशाणी क्र.२८.

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | :– | **सचिन सूरेश नारनवरे,** |
| **वय** | :– | २९ वर्षे, **धंदा** :– शेती, |
| **राहणार** | :– | कवठा, ता. सावनेर, जि. नागपूर. |

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्री.डी.आय.बारस्कर, विद्यमान सहाय्यक सरकारी वकील यांच्यामार्फत

आम्ही रस्त्याने जात असतांना पोलिसांनी आम्हाला दिवाकर खोब्रागडे यांच्या घराजवळ बोलावले. मी फिर्यादी उज्वला खोब्रागडे, प्रभाकर खोब्रागडे व दिवाकर खोब्रागडे यांना ओळखतो. ते माझ्याच वार्ड क्र.२ मध्ये राहतात. त्यावेळी त्यांच्याघरामध्ये घरगूती भांडणे झाली होती. पोलिसांनी पंचनाम्यासाठी आलो म्हणून आमच्या सहया घेतल्या. तो पंचनामा त्यांच्या घरात तयार केला होता. त्यावेळी लक्ष्मीदास वाघाडे याला सूद्धा बोलावले होते. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. पंचनाम्यास **निशाणी क्र.२९** देण्यात येते. याव्यतिरीक्त कूठलीही कार्यवाही माझ्यासमक्ष झाली नाही. (साक्षीदारास जप्ती पंचनाम्यावरील सही दाखविण्यात आली.) त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीस **निशाणी क्र.३०** देण्यात येते.

**(साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयाणाशी विसंगत साक्ष देत असल्याने विद्यमान सरकारी वकीलांनी उलटतपासात विचारण्यात येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात येत आहे.)**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.३१.०७.२०१९ रोजी पावसाळयाचे दिवस होते, पोलिसांनी मला व लक्ष्मीदास वाघाडे यांना लिखीत नोटीस देऊन फिर्यादीच्या घरी बोलावले होते, फिर्यादी पोलिसांना तीच्या पतीला ज्या ठिकाणी मारण्यात आले होते ते ठिकाण दाखवित होते. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मीदास वाघाडे व माझ्यासमक्ष आरोपीने मारहाण करण्यात आलेला लोखंडी रॉड पोलिसांना काढून दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस त्यांच्यासोबत रॉड घेऊन गेले. साक्षीदार सांगतो की, तो रॉड मला दाखविला नव्हता. सदर रॉड मला दाखविल्यास मी ओळखू शकणार नाही.

<u>उलटतपास आरोपीतर्फे – श्री.सी.बी.सरोदे वकील यांच्यामार्फत</u>

३. पोलिसांनी पंचनाम्याकरीता मला लेखी नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की,पोलिसांनी आमच्या समोर कोणतीही कार्यवाही केली नाही, आम्ही रस्त्याने जात असतांना आमच्या सहया घेण्यात आल्या. हे म्हणणे खरे आहे की, सहया घेण्याआधी पंचनाम्यातील मजकूर आधीच लिहीण्यात आलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यासमक्ष कोणतीही जप्तीची कार्यवाही झाली नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृती
समक्ष

दिनांक –०६.०८.२०२४.

(श्रीमती एन.व्ही. रणवीर)
२ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
सावनेर.